# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

## संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग

# प्रगत अभ्यासक्रम डिजिटल माध्यमे २०२४-२५

# त्वरित प्रवेश

संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे स्वयंनिर्वाही तत्त्वावर चालविला जाणारा 'पदव्युत्तर प्रगत अभ्यासक्रम डिजिटल माध्यमे' या अभ्यासक्रमाच्या चालू शैक्षणिक वर्ष २०२४-२५च्या २५ जागा रिक्त आहेत. या रिक्त जागांकरिता 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर विभागाकडून पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

- सदर अर्ज हे विभागात सोमवार दि. २९ जुलै आणि मंगळवार दि. ३० जुलै या दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या कालावधीत उपलब्ध असतील.
- अर्जांची संख्या ही कमाल ३० असून सदर अर्ज प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या पद्धतीने वितरित करण्यात येतील.
- पात्र विद्यार्थ्यांना त्वरित प्रवेश देण्यात येतील.
- विद्यार्थ्यांनी येताना सोबत शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती व अभ्यासक्रमाचे शुल्क रुपये ८३३०/- ऑनलाइन पद्धतीने भरण्याच्या तयारीसह येणे अपेक्षित आहे. शुल्कामध्ये कोणतीही सवलत उपलब्ध नाही.
- एका व्यक्तीस एकच अर्ज दिला जाईल.
- प्रवेश अर्ज घेऊन त्याच दिवशी प्रवेश न घेणाऱ्या उमेदवारांऐवजी पुढील पात्र उमेदवारांना प्रवेशाची संधी दिली जाईल.
- या अभ्यासक्रमासाठी इच्छूक विद्यार्थ्याने किमान पदवीपर्यंतची अर्हता प्राप्त केलेली असावी.
- प्रवेशासाठी कोणतेही आरक्षण ग्राह्य असणार नाही.
- प्रवेश खुल्या पद्धतीने व प्रथम येणाऱ्यास प्राधान्य याच तत्त्वावर दिले जातील.
- विद्यार्थ्याला अर्ज मिळाल्यास आवश्यक त्या माहितीसह त्याच दिवशी अर्ज विभागात जमा करून प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.
- संपूर्ण प्रवेश प्रक्रिया व अर्ज हे खालील पत्त्यावर उपलब्ध असतील.

प्रवेशप्रक्रियेसाठीचा पत्ताः

संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग,
रानडे इन्स्टिट्यूट आवार,
ना. गोपाळ कृष्ण गोखले रस्ता, (फर्गसन महाविद्यालय रस्ता)
डेक्कन जिमखाना, पुणे – ४११००४.

प्रवेशप्रक्रियेकरिता माहितीसाठी खाली दिलेल्या क्रमांकावर संपर्क करावा.

**प्रा. संदीप नरडेले – ९९३०३४१३३३, (०२०) २५६५४०६९**